1) रसिक वाचक या नात्याने संबंधीत व्यक्तीला स्वतःसाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा***.***

दि. २ डिसेंबर २०२१

प्रति,

मा. व्यवस्थापक

अभिषेक पुस्तकालय

१०१ गंज गोलाई गाळा क्र.१

लातूर - ४१३५१२

विषय : पुस्तकांच्या मागणी बाबत

महोदय,

स.न.वि.वि.

मी रसिक वाचक या नात्याने अभिषेक पुस्तकालय वर्धापनदिनानिमित्त तुम्हाला मनापासून शुभेच्छा देते आपण वर्धापनदिनानिमित्त रसिक वाचकांसाठी २०% सवलत ठेवल्याबद्दल अभिनंदन मला माझ्या आवडीची काही पुस्तके हवी आहेत.

ती पुस्तके मी मागवू इच्छितो. पुस्तकांची यादी तपशीलवारपणे सोबत जोडत आहे. कृपया मागवलेली सर्व पुस्तके लवकरात लवकर पाठवावीत. पुस्तकासोबत बिलही पाठवावे. आपण या पुस्तकावर योग्य अशी सवलत दयाल असा विश्वास आहे.

पुस्तकांची यादी खालीलप्रमाणे आहे.

अनुक्रमांक	पुस्तकाचे नाव	लेखकाचे नाव	प्रति
१	श्यामची आई	साने गुरुजी	२
२	ययाती	वि.स. खांडेकर	१
३	नटसम्राट	वि.वा. शिरवडकर	२

४	झोंबी	आनंद यादव	४
५	अपूर्वाई	पु.ल. देशपांडे	२

वरील पुस्तके वेळेत पाठवावी ही विनंती.

आपली विश्वासू,

मेघा गायकवाड

गोपाळ नगर.

ईमेल: megha@thebrieflywire.com